| MHKO070014932014 | **नियमित दिवाणी दावा क्र.२५५/२०१४** |
| --- | --- |
| | सुनिल भुपाल कुरणे आणि इतर<br>विरुध्द<br>पंडीत रुकाप्पा कुरणे आणि इतर |

**निशाणी क्र.६४ खालील आदेश**

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादी यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, सदर प्रकरणातील वादी क्र.४ इंदुबाई भुपाल कुरणे या दि.३०/०५/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना वादी हे वारस असुन ते यापुर्वीच रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे इंदुबाई भुपाल कुरणे यांचे नावास कंस करुन मयत असे लिहीणेस परवानगी मागितली आहे. विरुध्द बाजुने सदर अर्जाच्या पाठीमागे आपले म्हणणे देवुन न्यायाच्या हेतुस्तव योग्य ते आदेश पारित करणेविषयी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतचा दावा हा वाटप आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी नि.क्र.६३ ला वादी क्र.४ इंदुबाई भुपाल कुरणे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यावरुन वादी क्र.४ या मयत झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रथमतः त्यांच्या नावासमोर मयत लिहीण्यास वादीस परवानगी दिली तर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीने कथन केले आहे की, त्यांचे वारस हे यापुर्वीच रेकॉर्डवर आहेत. प्रतिवादींचे म्हणणे पाहता त्यांनी ते नाकारल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे वादी कथित प्रमाणे वादी क्र.४ च्या नावापुढे मयत शेरा मारण्यास परवानगी देणे गरजेचे आहे. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादींचा अर्ज (नि.क्र.६४) हा मंजूर करणेत येतो.

२. वादींनी त्या अनुषंगाने दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.04 17:11:43 +0530

दि.०४/०५/२०२६

जयसिंगपूर.

**(अ. त्रिं. मनगिरे)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale. |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,<br>Jaysingpur. |
| Date of Dictation. | 04/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 04/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 04/05/2026. |